संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# वाखरीच्या माहेरघरी विश्वनाथ सेवा करी

तो अहंकाराते दंडुनी । सकळ काम सांडुनी ।
बिचारे विश्व होऊनी । विश्वामाजी ।।

**संत ज्ञानेश्वर** माऊलींच्या मनामध्ये असणारी संपूर्ण विश्वाची काळजी त्यांच्या अनेक अभंगांमधून, ओव्यांमधून वेळोवेळी प्रकट झालेली आहे. काही ठिकाणी त्यांनी भक्ताला विश्वाशी एकरुप व्हायला सांगितले आहे. तर काही ठिकाणी विश्व मोहोर लावण्याचा उपाय दाखवला आहे. संपूर्ण विश्वामध्ये स्वधर्म सूर्याचा प्रकाश पसरावा किंवा याच ज्ञानेश्वर माऊलींनी परमेश्वराच्या सगळ्या परमभक्तांचे वर्णन करताना त्यांच्यात विषम भाव नसावा, असे भाव व्यक्त केले होते. त्याच परमेश्वर भक्तांची म्हणजेच विठ्ठल भक्तीने देहभान हरपणाऱ्या वारकऱ्यांची सेवा हादेखील विश्व मोहोर लावण्याचा किंवा स्वधर्म सूर्याचा प्रकाश पाडणारा प्रकाश ठरतो. विठ्ठलाच्या विश्वामध्ये रमलेल्या वारकऱ्यांची पंढरपूरजवळच्या वाखरीच्या तळावर विश्वनाथ कराडांनी आरंभलेल्या या सेवेला सेवा माऊली असे म्हणतात.

त्याप्रमाणे अहंकार दंडुनी सकळ काम सांडुनी विश्व होऊन वावरण्याचा भक्तिभाव म्हटला पाहिजे. गेल्या काही वर्षांपासून श्री क्षेत्र देहू-आळंदी विकास समितीतर्फे आणि त्यांच्या एमआयटी शिक्षण संस्थेच्या वतीने सेवेच्या वृदांवनाचे रिंगण भरवले जाते. महिना दीड महिना पायी प्रवास करत लाखो वारकरी शेवटच्या टप्प्यावर जेव्हा येऊन पोहचतात तेव्हा त्यांच्या वैखरीला विश्राम देतांनाच त्यांच्या सेवेचे पुष्पार्पण केले जाते. विठ्ठल नामाचा जिभेला चाळा पडलेला असतो. विठ्ठल नामाशिवाय दुसरा ध्यास नसतो. त्या वैखरीला वाखरी मुक्कामी आणखीनच उधाण येते. अवघ्या महाराष्ट्रातल्या सगळ्या दिंड्या पालख्या जिथे गोळा होतात त्या वाखरीच्या तळावर जणू काही प्रतीपंढरपूरच अवतरते. सगळ्या वारकऱ्यांची जमलेली ही मांदियाळी प्रत्यक्ष विठ्ठल माऊलीचे साकार रुप वाटायला लागते. आषाढ नवमीला वाखरीचा परिसर विठ्ठल नामाने दुमदुमून निघतो. पुढच्या दोन दिवसात पंढरपूरला जाऊन पांडुरंगाचे दर्शन घेण्याची उत्कंठता शिगेला पोहचलेली असते. विठ्ठलभक्तीमध्ये रंगून गेलेल्या या भक्तांची तितक्याच मनोभावे सेवा करून प्रत्यक्ष पांडुरंग भक्तीचे श्रेय प्राप्त केले जाते. महाराष्ट्रात शेकडो वर्षांपासून सुरू असलेली ही वारीची परंपरा म्हणजे भागवत धर्माच्या परंपरेचा सर्वात मोठा गौरव असतो. त्याला सेवारुपी मानवंदना देण्याचे काम डॉ. विश्वनाथ कराड  हे गेल्या काही वर्षांपासून करत आहेत. वाखरीवरच्या विश्वाचा हा विश्वनाथरुपी सेवेकरी असेच त्यांचे वर्णन करायला हवे.

## तत्वज्ञानाचे साकार रुप

भक्तीच्या तत्वज्ञानामध्ये अनेक संतांनी महंतांनी फार महत्त्वाचे विचार मांडून ठेवले आहेत. मनुष्य जीवनाचे सार्थक हे त्याच्या आध्यात्मिक किंवा सामाजिक चिंतनामध्ये दडलेले असते. ते समजून घेतले पाहिजे. काहीसा भावभोळा वारकरी हे आध्यात्मिक तत्वज्ञान वारीच्या माध्यमातून प्रत्यक्ष आचरणात आणतो  तर या तत्वज्ञानाला सेवेच्या माध्यमातून अलंकृत करण्याचा प्रयत्नही होत असतो. तत्वज्ञान हे जोपर्यंत व्यवहारात येत नाही, तोपर्यंत त्यातल्या ज्ञानाचा आत्मज्ञानाच्या दिशेने प्रवासच सुरु होत नाही. भारतीय संस्कृतीचे हे फार मोठे वैशिष्ट्य आहे. भक्ती आणि अध्यात्माच्या माध्यमातून या तत्वविवेचनाला साकार रुप केले जाते. वारी सुरू झाल्यापासून ते पंढरपुरात पोहचेपर्यंत वेगवेगळ्या पद्धतीने दिसणारी तिची रुपे बरेच काही सांगून जाणारी असतात. वाखरीच्या मुक्कामावर वारकरी पोहचतात आणि त्यांच्या सेवेसाठी सेवेकरीही तयार असतात. कारण वारी हा केवळ प्रवास नसतो, तो विठ्ठल भक्तीचा ध्यास असतो. ती केवळ दिंडी किंवा पालखी नसते तर विठ्ठल नामाची एक अलौकिक शक्ती असते. अशा लाखो वारकऱ्यांच्या हृदयातून मनातून एकाचवेळी प्रगट होणारा हुंकार असतो. त्याची ताकद जगातल्या कोणत्याही फूटपट्टीने मोजता येत नाही. ती तितक्याच शरणागत मानसिकतेतून समजून घ्यावी लागते. वाखरीला अर्पण केली जाणारी वारीच्या चरणी ही सेवा म्हणजेच विठ्ठलाच्या समचरण भक्तीचा तो अविष्कार ठरतो. जगद्‌गुरु तुकाराम महाराजांनी वारीचे महत्त्व सांगताना वारकरी आपल्या माहेरी येत असतो, असे वर्णन केले होते. आणि म्हणून वाखरीला येणारा वारकरी माहेरी येतो. आणि तितक्याच माहेरच्या आदरातिथ्याचा आणि ममतेचा अनुभव घेतो. वारी हे जगातले खरेतर आश्चर्य म्हटले पाहिजे. कोणत्याही संस्कृतीमध्ये किंवा धर्मामध्ये महिना -दीड महिना पायी चालत डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन अबाल वृद्ध एकाच दिशेने आणि एकाच ध्येयाने प्रेरीत होण्याचा प्रकार फक्त भारतीय संस्कृतीतच पाहायला मिळतो. त्याच ध्येयाचे वेगळे स्वरुप डॉ. विश्वनाथ कराड यांच्यासारख्या तरुण वाखरीच्या माहेरघरी साकारले जाते.

## वारी जिथे खरी ठरते

त्यांच्या संस्थेच्या वतीने २५ एकर जागेत वारकऱ्यांच्या अंघोळीची तसेच साजूक तुपातल्या गोड शिऱ्याच्या प्रसादाची व्यवस्था होते. तब्बल दीड ते दोन लाख वारकरी त्याचा लाभ घेतात. त्या काळात विठ्ठल रुक्मिणी आणि ज्ञानोबा तुकारामांची अतिशय लोभस प्रतिमा वाखरीच्या तळावर साकार होते. शरीराला विश्रांती मिळत असताना मनाला सेवारुप श्रीमंती लाभण्याचा अनुभव हा माऊलीस्वरुप वारकरी याठिकाणी घेत असतो. या परिसरामध्ये डॉ. कराड यांनी अक्षरश: तुळशीची हजारो रोपे लावून भक्तीचे भावविभोर वृंदावनच निर्माण केले आहे. शक्य तितकी स्वच्छता, प्रसन्नता आणि मांगल्य टिकवणारा हा उपक्रम वारकऱ्यांना आता सवयीचा झाला आहे. या काळात अनेक संस्था संघटना याच पद्धतीने वारकऱ्यांच्या सेवेमध्ये दाखल होत असतात. परंतु जिथे औपचारिकता संपून आपुलकी प्राप्त होते त्या प्रयागअक्का कराड यांच्या स्मृत्यर्थ उभारलेल्या परिसरात पहायला मिळते. या निमित्ताने एका वेगळ्या सेवेचा संदेश दिला जातो. ज्या संतांनी विठ्ठल भक्तीला आपल्या जीवनाची सार्थकता मानली होती त्याच संतांनी सुरू केलेल्या वारीची उदात्तता या पद्धतीने व्यक्त करण्याचे काम विश्वनाथाच्या वाखरीच्या माहेरघरी सुरू आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. वारी जिथे खरी ठरते ती ही वाखरी आणि तिथे वैखरीला माहेरघरी आल्याचा आनंद होतो ती वाखरी, असे त्याचे वर्णन करता येईल.